MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात



प्रतिनिधी । बीड

बीड मतदारसंघातील काही ठिकाणी रेल्वे ब्रीज नसल्यामुळे वाहतुकीस अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान बुधवारी (दि.५) रोजी बीड रेल्वेची हाय स्पीड टेस्ट करण्यासाठी रेल्वेचे सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा आले असता त्यांच्यासमोर आ.संदीप क्षीरसागर यांनी हा विषय मांडला.

बीड मतदारसंघातील क्षेत्रांतर्गत शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा, बरगवाडी, जवळागिरी तसेच बीड तालुक्यातील चर्हाटा येथे जाण्यासाठी रेल्वे पूल करण्यात आला नाही.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०२ अंक –१४२ गुरूवार दि.०६ फेब्रुवारी २०२५ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -142 THURSDAY DT.06 FEBRUARY 2025 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# पि आय अशोक मुदिराजसह तीन जणांची वेतनवाढ रोखली? तात्काळ निलंबनाची नागरिकांतून मागणी

- कथित सामुहिक अल्पवयीन मुलीच्या बलात्कार प्रकरणातील आरोपींना सोडून देणे अंगलट आले? पेठ बीड पोलीस निरीक्षकांसह तीन जणांचे वेतन वाढ रोखली?
- मुदीराज, उगले, सानप, उबाळे यांच्या वर कारवाई होण्याची शक्यता विश्वासने सूत्रांनी दिली माहिती? पेठ बीड पोलीस ठाण्यामध्ये पीडित मुलगी व आरोपींना आणून सोडून देण्यात आले होते. पेठ बीड पोलीस स्टेशन डायरीला नोंद न घेताच आरोपींना सोडून दिल्यामुळे दोषी ठरवले?
- मनोरुग्ण अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणातील तपास व आरोपींना सोड्डुन दिल्या प्रकरणी पोलीस निरीक्षकासह तीन पोलीस कर्मचाऱ्यांची इन्क्रिमेंट रोखण्यात आलेली आहे विश्वसनीय सूत्रांकडून समजते?
- बलात्कार घटनास्थळावर आरोपींची मोटार सायकल स्पष्ट दिसत असताना सुद्धा आरोपी का सापडत नव्हते? संबंधित चौकशीत निष्पन्न झाले








प्रतिनिधी । बीड

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कथित मनोरुग्ण अल्पवयीन मुलीवर तीन नराधमांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना पोलीस ठाणे हद्दीतील बार्शी रोडवरील नामांकित पॉलिटेक्निकल कॉलेजच्या समोरील पाण्याच्या टाकी खाली रात्री साडेअकरा ते साडेबाराच्या दरम्यान एक बलात्काराची घटना घडली होती. इमामपुर रोड प्रकाश आंबेडकर नगर येथील चोरांच्या आफवेच्या भीतीमुळे काही रात्रीच्या वेळेस नागरिक जास्त घालत होते. प्रकाश आंबेडकर इमामपूर रोड येथील नागरिकांना बार्शी रोडवरील पाण्याच्या टाकीच्या झाडा झुडपामध्ये एक अल्पवयीन मनोरुग्ण बीड शहरामध्ये भिक मागून जगणारी मुलगी दिसून आली संबंधित मुलीवरती तीन नराधम अत्याचार करत होते. हे संबंधित रात्रीच्या वेळी गस्त घालणाऱ्या लोकांनी पाहिले आणि डायल ११२ वरती कॉल केला त्यानंतर पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस संबंधित घटनास्थळावरती दाखल झाले पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी हनुमंत उगले हा व फौजदार रमेश उबाळे हे घटनास्थळावरती दाखल झाले संबंधित मुलीला त्या ठिकाणावरून पोलीस स्टेशन येथे घेऊन गेलेत सोबत जाताना नराधम आरोपींनाही पोलीस स्टेशनला घेऊन गेले घटनास्थळावर आरोपींची मोटरसायकल ही पोलीस स्टेशनला घेऊन गेले खरे परंतु त्या ठिकाणी जात असताना नराधम आरोपींची मोटरसायकल व आरोपींना पेठ बीड पोलीस स्टेशनला घेऊन गेल्यानंतर संबंधित आरोपींना पोलीस स्टेशन मधून हनुमंत उगले व रमेश उबाळे यांनी कोणाच्या आदेशाने सोडून दिले पोलीस ठाण्यातून संबंधित मुलीला बीड शहरातील निवारा केंद्रामध्ये अवैधरीत्या ठेवण्यात आले यानंतर दैनिक महाराष्ट्र आरंभ ने बातमी लावून धरली व संबंधित मुलीला न्याय देण्यासाठी दैनिक महाराष्ट्र आरंभाने पाठपुरावा केल्यानंतर बीडचे विद्यमान अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी तपासाचे चक्र फिरवले नंदकुमार ठाकूर तत्कालीन एसपी यांनी तपासाचे आदेश दिल्यानंतर संबंधित नरेंद्र आरोपींचे सीसीटीव्ही फुटेच्या माध्यमातून निष्पन्न झाले यानंतर तीन आरोपींच्या विरोधामध्ये पेठ पोलीस ठाण्याचा पोलीस कर्मचारी हनुमंत उगले यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीचे विरोधात फिर्याद का देण्यात आली तसेच हनुमंत उगले व रमेश उबाळे यांनी डायल ११२ वरती कॉल गेल्यानंतर संबंधित पीडित मुलीला व नराधम आरोपींना पेठ पोलीस ठाण्यामध्ये घेऊन गेल्यानंतर त्या ठिकाणाहून आरोपींना सोडून देत असताना पेठ बीड पोलीस ठाण्याच्या स्टेशनरी ला नोंद घेतली नव्हती. त्यामुळे तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी चौकशीचे आदेश दिले व एक चौकशी समिती स्थापन केली या चौकशी समितीचे प्रमुख म्हणून होम डिवायएसपी उमेश कस्तुरे यांनी काम पाहिले संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी केली असता सानप नावाच्या रात्री नाईट ड्युटीवर असलेले सानप नावाचे पीएसओ सांगितले की सामूहिक हनुमंत उगले व रमेश उबाळे यांनी पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांना कल्पना दिली होती मला नोंद त्यांनी घेऊन दिली नाही का त्यांनी का घेतली नाही. असं आपणास सविस्तर माहिती ही पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज साहेब यांनाच विचारा आरोपींना पेठ बीड पोलीस स्टेशनमध्ये आणून सोडून देण्याचे पाप आर्थिक तडजोडी मध्ये लक्ष्मी दर्शन करून घेतल्याचे चित्र त्यावेळी स्पष्ट होते. व त्यानंतर संबंधित मुलीची हेळसांड करत त्या मुलीला कोर्टामध्ये हजर केले बाल सुधाकर गृह येथे सोपवण्यात आले त्यानंतर संबंधित मुलीची नियमबाह्य अंबाजोगाई येथील एका खाजगी शाळेमध्ये त्या मुलीला पाठवण्यात आले त्या ठिकाणी सध्या ती मुलगी आहे का हे पाहणे गरजेचे आहे. तर संबंधित प्रकरणात आरोपी आर्थिक तडजोड करून सोडून दिल्याचे स्पष्ट होते. तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर उमेश कस्तुरे होम डिवाएस पी यांनी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी केली तर यावेळी संबंधित प्रकरणाची चौकशी करत असताना पोलीस स्टेशन पेठ बीड येथे आरोपींना सोडून दिले व पीडित मुलीलाही बीड शहरातील नगरपरिषदेच्या एका निवारा केंद्रामध्ये ठेवण्यात आले संबंधित मुलीची घटना घडली त्यादिवशी व आरोपी सोडून दिले त्या दिवशी पोलीस स्टेशन पेठ बीडला का स्टेशन डायरीत नोंद का घेतली नाही म्हणून होम डिएसपी उमेश कस्तुरे यांनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व फौजदार रमेश उबाळे पोलीस कॉन्स्टेबल हनुमान उगले सानप नावाचे नाईट ड्युटी वरती असलेले इन्क्रिमेंट वेतन वाढ रोखण्याची शिफारस छत्रपती संभाजी नगरचे आयजी मिश्रा साहेब यांच्याकडे पाठवले आहे. यामध्ये संबंधित प्रकार यामध्ये ते दोषी असल्याची विश्वसनीय सूत्रांनी सायंकाळी महाराष्ट्र आरंभ ला बोलताना प्रतिक्रिया दिलेली आहे. त्यामुळे त्यांचे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांचे तीन वर्षाचे तर फौजदार रमेश उबाळे, हनुमंत उगले, सानप याचे पेठ बीड त्या दिवशी नाईट ड्युटी वरती असलेले सानप नावाची पी एस ओ यांची दोन दोन वर्षाचे इन्क्रिमेंट वेतन वाढ रोखण्यात आलेली आहे. संबंधित कर्मचारी हे वादग्रस्त आहेत यांनी आर्थिक तडजोड करत आरोपी व आरोपींची मोटर सायकल पोलीस ठाण्यातून त्या दिवशी रात्री सोडून देण्यात आली होती. बाब ही तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ चौकशी आधी दिली व पिढीतील न्याय देण्यासाठी त्यानंतर पोलीस कर्मचाऱ्याला आपल्या प्रकरण आल्यामुळे पोलीस ठाण्याचेपोलिस निरीक्षक व कर्मचाऱ्यांना एकत्र झाली आणि त्याच्या मध्ये संबंधित घटनेच्या मनोरुग्णांच्या बाजूने पोलिसांनी फिर्याद देत असताना हनुमंत उगले लाच का पोलीस तेला लावली संबंधित घटनेची जबाबदारी झटकणाऱ्या कर्मचाऱ्यांनी संबंधित प्रकरण अंगणात येऊन आपल्या निलंबनाची कारवाई होऊ शकते म्हणून त्या ठिकाणी अज्ञात आरोपींच्या विरोधात फिरत देण्याचे षड्यंत्र असले व त्यामध्ये स्वतः गुंतले असल्यामुळे आता हे पेठ बीड पोलीस अधिकारी कर्मचारी दोषी असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे? असल्याने आता छत्रपती संभाजी नगरचे आयोजित याबद्दल काय निर्णय देतात याकडे संबंध पोलीस प्रशासनाचे लक्ष लागलेले आहे.

पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये काही दिवसापूर्वी नराधम आरोपींनी अल्पवयीन मनोरुग्न मुलीवरती पेडमिळ हद्दीमध्ये बलात्कार केला होता ही घटना संबंधित लोकांनी बघून डायल ११२ वरती कॉल केला होता परंतु पेमेंट पोलीस स्टेशनची भूमिका ही वादग्रस्त ठरलेली आहे यामध्ये तत्कारी न्युज पेपर यांनी ही कारवाई करण्याचे आदेश दिले होते त्यानंतर संबंधित जोशी पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांचे विरोधामध्ये ठपका ठेवत तत्कालीन एस पी नंदकुमार ठाकूर यांनी एक चौकशी समिती स्थापन केली संबंधित चौकशी समितीने अहवाल सादर केला आहे यामध्ये पोलीस निरीक्षक व तीन पोलीस कर्मचारी वेतन वाट रोखल्यामुळे पोलीस प्रशासनातील अनेक अधिकारी कर्मणांचे धाबे दणाणले आहेत यांच्या कार्यकाळांमध्ये अपराध्याला शिक्षा व पिढीतला न्याय मिळावा म्हणून दैनिक महाराष्ट्र आरंभ यानंतर सुद्धा याचा पाठपुरावा करणार आहे संबंधित घटनेशी जबाबदार व दोषी आढळलेल्या पोलीस कर्मचारी अधिकारी यांना पोलीस ठाण्यातून तात्काळ पोलीस मुख्यालय किंवा पोलीस अधीक्षक कार्यालय या ठिकाणी बदली करण्याची ही मागणी पोलीस ठाण्यात येथील नागरिकांकडून चर्चा जोर धरू लागली आहे

**सायं.दै. आरंभ इफेक्ट**

**नुसते वेतनवाढ रोखणे हा उपाय नव्हे तर त्या दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई हवी!**



ताडसोन्ना ग्रामपंचायतचे भावी सरपंच सुरेश माने सर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात सजरा करण्यात आला यावेळी उपस्थित जमीर शेख (भावी मेंबर ताडसोन्ना ) राधेश्याम माने (युवा उद्योजकगणेश माने(मा.उपसरपंच ताडसोन्ना ) आतुल वीर (ग्रामपंचायत अधिकारी गेवराई ) बाळु गात (सरपंच शिरापुर) शहेबाज पटेल (शासकीय गेत्तेदार) संदीप डोके(सरपंच कदमवाडी)अशोक धुळगुंडे (ताडसोन्ना ग्राम पंचायत सदस्य ) अशोक शिंदे (युवा उद्योजक ) समद शेख ( दिव्य लोकप्रभा -पत्रकार )शकील शेख (भावी मेंबर ताडसोन्ना ) रंजित गायके (भावी मेंबर ताडसोन्ना ) दत्ता मगर ,संदिप माने सदाशिव मुंडे (युवा उद्योजक ) विनोद माने, दत्ता बाबुराव माने (आदर्श गुरुकुल माजलगाव)नामदेव माने, आदी दिसत आहे.

# सरपंच शितलताई साखरे यांच्या पुढाकारातून जुन्या रुढींना फाटा देत 'सौभाग्या'चा सन्मान!



प्रतिनिधी । गेवराई

गेवराई : जुन्या रूढी-परंपरांना फाटा देत धोंडराई ग्रामपंचायत च्या सरपंच शितलताई साखरे यांनी खेडेगावातील विधवा , वयस्कर आजी समवेत सर्व महिलांचा हळदी-कुंकू समारंभ आयोजित करून त्यांच्या 'सौभाग्या'चा सन्मान केला. व महिलांसाठी खेळ घेऊन बक्षीस वाटप करण्यात आले. मकर संक्रांतीनंतर महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ सुरू होतात. भेटीगाठी आणि संवाद होत असल्याने महिलांचे छोटेखानी स्नेहसंमेलनच जणू पार पडते. पण खेडेगावातील आनंद घेता येत नाही. त्याचबरोबर विधवा महिलांना, वयस्कर आजींना मात्र या सोहळ्यांमध्ये सामावून घेतले जात नाही. याच परंपरेला फाटा देण्याचा निर्धार सरपंच शितलताई साखरे यांनी केला आहे. महिलांसाठी या विशेष सोहळ्याचे आयोजन केले होते. खळेगाव, तळणेवाडी , कोमलवाडी व धोंडराई या ठिकाणी हा सोहळा पार पडला.

हळदी कुंकू समारंभ हा कोणत्याही महिलेला उपेक्षित ठेवणारा, तिला वेगळी वागणूक देणारा कार्यक्रम न राहता तो सर्वच खियांचा सन्मान करणारा, सामावून घेणारा कार्यक्रम झाला पाहिजे ही माझी भूमिका राहिलेली आहे. अशी भूमिका शितल ताई साखरे यांनी मांडली.या वेळी खेडेगावातील महिला म्हणाल्या, महिलांसाठी अशाप्रकारे आनंदाचा कार्यक्रम खेडेगावात पहिल्यांदाच होतो आहे, याचे आम्हला समाधान वाटत आहे. या वेळी हळद कुंकू लावून त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जिल्ह्यातील दिव्यांगांना मिळणार मोफत फिरते वाहन दुकान

## योजनेचा लाभघेण्यासाठी ६ फेब्रुवारी पर्यंत अर्ज करावेत-कैफ पटेल

प्रतिनिधी । बीड

जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळाअंतर्गत हरित ऊर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्यावाहनावरील दुकान (मोबाइल ऑन ई-व्हेइकल) मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील विविधप्रकारच्या व्यवसाय सुरू करण्यासाठी फिरते वाहन दुकान योजनेचा लाभघेण्यासाठी विविध प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या व इच्छाशक्ती असणाऱ्या दिव्यांगांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख येत्या ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आहे. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते जे.डी. शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहेप्रसिद्ध पत्रात पुढे म्हटले आहे की दिव्यांग वित्त व विकास महामंडळातर्फे १० जून २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदर योजनेंतर्गत दिव्यांगांना रोजगारनिर्मितीस चालना देणे, दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, हा उद्देश आहे. २.२५ लाखा रुपयांचे मोबाईल व्हेइकल या योजनेंतर्गत १०० टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. यासाठी अर्ज भरण्यासाठी ६ फेब्रुवारीची अंतिम मुदतयोजनेचा लाभगरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणीची प्रक्रिया २२ जानेवारीपासून सुरू करण्यात आली असून, दिव्यांग व्यांग व्यक्तींकडून ६ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले आहेत असुन



महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत पोर्टलवर सुविधादिव्यांगांना फिरते वाहन योजनेचा लाभ मिळविण्यासाठीहींींिः//िशसळींशी.ीहषवल.ले.ळप या लिंकवर अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे. सदर लिंकबर क्लिक केल्यानंतर दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे पोर्टल उघडले जाते. त्यानंतर अर्ज भरण्याची सुविधा यात देण्यात आली आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे की दिव्यांगांना लाभ घेण्यासाठी पुढील प्रमाणे अटी, शर्थी व अटी लागू करण्यात आले आहे. यासाठी अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा, जिल्हा शल्यचिकित्सक किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले किमान ४०% दिव्यंगत्वाचे प्रमाणपत्र असावे, अर्जदार १ जानेवारी २०२४ या दिनांकाच्या दिवशी १८ ते ५५ या वयोगटातील असावा. मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत पालक अर्ज करण्यास सक्षम असतील, दिव्यांग अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख पेक्षा अधिक नसावे, अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस वाहन चालवण्याचा परवाना नाकारल्यास परवानाधारक नसलेल्या अतितीव्र व्दिव्यांगाच्या सोबतच्या सहाय्याने फिरता मोबाईल व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील गरजु दिव्यांगांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज दाखल करावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते कैफ पटेल यांनी केले आहे.

# त्यागमूर्ती माता रमाई याच्या भव्य मिरवणुकीत सहभागी व्हा :- ऍड तेजस वडमारे

प्रतिनिधी । बीड

०७/०२/२०२५ रोजी बलभीम नगर पालवण रोड बीड आयोजित त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहात होणार असून सकाळी ठीक :०९:०० वाजता बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजीनगर पालवण रोड बीड येथे अभिवादनचा कार्यक्रम होणार आहे व सकाळी१०:०० ते ०५:०० वाजे पर्यंत भोजनदान होणार आहे तरी बीड शहरातील शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराच्या व तमाम भीम अनुयायी बौध्द उपासक उपासिका, बालक बालिका,




समाजबांधव यांनी मोठया संख्येने शिवाजीनगर येथील बलभीम नगर बुद्ध विहार येथे सायंकाळी ठिक ०६:०० वाजता उपस्थित राहावे असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ वडमारे व सचिव अजय जाधव

## रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान करणाऱ्या

# राहुल सोलापूरकरच्या प्रतिमेला लिंबागणेश येथे जोडे मारून निषेध :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । लिंबागणेश

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्र-याहुन सुटकेच्या प्रसंगाबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ आज दि.०६ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील शिवतीर्थ याठिकाणी शिवप्रेमींनी राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात घोषणाबाजी करत प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. याचवेळी ईतिहासाची मोडतोड करून हेतुपुरस्सर शिवरायांचा अवमान करून शिवप्रेमींच्या भावना जाणिवपूर्वक दुखावणा-या राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी बालाघाटावरील शिवप्रेमींनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार यांना केली आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील,विक्रांत वाणी , अँड.गणेश वाणी, दामोदर थोरात, अक्षय वाणी,अशोक वाणी,आरूण निर्मळ, जितु निर्मळ,राजेभाऊ मंडलिक, चिंतामण ढास, पांडुरंग वाणी , विवेक बागल, रेवण येडे,रवी वायभट, महावीर वाणी,विशाल येडे , नवनाथ बोराडे,सोनाजी शिंदे, रतन शिंदे,अक्षय येडे आदी सहभागी होते.

अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी एका पॉडकास्ट मध्ये बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान केले होते.शिवाजी महाराज हे चक्क लाच देऊन आग्र-याहुन सुटुन महाराष्ट्रात आले होते.ते मिठाईच्या पेटा-यातुन सुटले ही दंतकथा असल्याचे त्यांनी म्हटले होते.एवढेच नाही तर त्यावेळी पेटारे वगैरे काही नव्हते असं देखील राहुल सोलापूरकर म्हणाले. यामुळे एकंदरीतच राहुल सोलापूरकर यांच्या मनात बहुजन राजांबद्दल द्वेष



असल्याचे त्यांच्या वक्तव्यातुन जाणवते. त्यांची मानसिकता ईतिहासाची मोडतोड करून शिवरायांच्या पराक्रमाबद्दल त्यांच्या बुद्धीचातुर्याबद्दल शंका उपस्थित करून महात्म्य कमी करण्याचे षडयंत्र दिसून येत आहे. यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असुन राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारुन निषेध व्यक्त करत त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# मनुष्य जीवनात साधूसंतांच्या कृपेशिवाय प्रगती अशक्य - महंत दत्ता महाराज गिरी

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथगडावर हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता वै.वामन गिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भाविकांचा जनसागर उसळला

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई : मनुष्य जीवनात प्रत्येकाने साधु संतांचे आशीर्वाद घेतले पाहिजेत कारण संत हे पृथ्वीतलावर देवाचा अवतार घेवून जन्म घेतात. तर संत कृपेसाठी प्रत्येकाने या ज्ञानयज्ञ मंडपात आले पाहिजे. देव, संत आणि आपण एकरुप झालो की तो काला होतो. परमार्थात भक्तीतल्या काल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तर मनुष्य जीवनात साधूसंतांच्या कृपेशिवाय प्रगती करणं अशक्य आहे. असे प्रतिपादन श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांनी व्यक्त केले.श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव (ता.गेवराई) येथे वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत ह.भ.प.वामन म. गिरी यांच्या ५३ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी महंत ह.भ.प दत्ता म. गिरी यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी भक्तमंडळींनी महंत दत्ता महाराज यांचे ढोलताशासह टाळ मृदगांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत केले. यावेळी युवा नेते रणवीर पंडित, भाजप तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे, भाजप समन्वयक श्रीकांत सानप, परमेश्वर म.वाघमोडे, दामोदर भोसले, पांडुरंग म.जाधव,



सुघोष मुंडे , शिवाजी म.गिरी, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार, पत्रकार विनोद नरसाळे, संपादक अमोल वैद्य, कैलास म.गिरी, नामदेव म.पौळ, तुकाराम म.गिरी, उमेश भोसले, श्रीधर पौळ, दादाभाऊ घुगे, पत्रकार विनोद पौळ, आबासाहेब शेंबडे , रामबप्पा लेंडगुळे, बंडू बावचकर यांच्यासह संत-महंत व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना दत्ता महाराज म्हणाले की, संत हे समाजाच्या कल्याणासाठी काम करतात म्हणून परमार्थात मन लावून संतांच्या चरणाशी रहा. तसेच जीवनात मिळालेल्या संपत्तीचा सत्कार्यासाठी उपयोग करा.साधूचे देव ऐकतो. साधू धर्माचे पालन करतात. श्री क्षेत्र गोरक्षनाथगड हे परिसराचे वैभव आहे. नाथ परंपरेची जो सेवा करतो त्यास कशाचीही कमतरता भासत नाही. वै.वामन महाराज हे थोर महान तपस्वी पुरुष होते. ते समाजासाठी शेवटपर्यंत झिजले त्यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी होते. त्यांच्या आशीर्वादाने गोरक्षनाथगडाची महती दिवसेंदिवस वाढत आहे. संताचे मन विशाल असते, त्यांच्याशी स्नेह राहू द्या परमार्थात मन स्थिर राहते. संताच्या आधाराने जगणे सुंदर करता येते देवाची संगत धरून चालत रहा. तसेच प्रत्येकाने ज्ञानेश्वरीचे वाचन करा तुळशीला पाणी घाला आईवडिलांची सेवा करा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी पंचक्रोशी परिसरातील सुप्रसिद्ध गायक, वादक, मृदंगाचार्य तसेच दिनानाथ गुरुकुल वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी यांची साथ-संगत लाभली. कीर्तनानंतर उपस्थित हाजारो भाविकांना कवडगाव येथील जगन्नाथ सुखराम भोसले यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी सांगता सोहळ्यास महिला व पुरुष भाविकांचा अक्षरक्षा: जनसागर उसळला होता.

# राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर उर्जेवर चालवल्या जाणार : देवेंद्र फडणवीस

## आष्टी तालुक्यातील खुंटेफळ उपसा सिंचन योजनेच्या कामाचा शुभारंभ

प्रतिनिधी । आष्टी

महाराष्ट्रातील अनेक गावांनी दुष्काळ सोसलेले आहेत. २०१८ च्या दुष्काळानंतर जलयुक्त शिवारच्या माध्यमातून बऱ्यापैकी गावे पाणीदार झाली. आताच्या पिढीने दुष्काळ पाहिलेला असला तरी पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू द्यायचा नाही त्या अनुषंगाने सरकार काम करत आहे राज्यातील सर्व दुष्काळी भागाला पाणी देण्याचा आणि शेती समृद्ध करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. विजेचा खर्च टाळण्यासाठी राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौरऊर्जेवर चालवल्या जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथील बहुचर्चित आणि अनेक वर्षापासून रखडलेल्या व आमदार सुरेश धस यांचा ड्रीम प्रोजेक्ट कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत खुंटेफळ उपसा सिंचन योजनेच्या कामाचा शुभारंभ बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे , खासदार बजरंग सोनवणे आमदार सुरेश धस, प्रकाश सोळंके विजयसिंह पंडित ,संदीप क्षीरसागर,नमिता मुंदडा माजी आमदार साहेबराव दरेकर,भीमराव धोंडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस म्हणाले, मराठवाड्यासह या खोऱ्या अंतर्गत येणाऱ्या राज्यातील दुष्काळी भागाला कृष्णा खोऱ्याचे पाणी मिळाले पाहिजे, असा विचारपूर्वी पुढे आला त्यासाठी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी पुढाकार घेतला होता. त्यानंतर या खोऱ्यातून २३ टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळावे असा निर्णय केला. मात्र त्यानंतर काही कारणाने हा निर्णय पुढे जाऊ शकला नाही. मी मुख्यमंत्री झाल्यावर असे लक्षात आले की २३ टीएमसी पाण्यापैकी केवळ सात टीएमसी पाणी असून राहिलेले पाणी दिसतच नव्हते. पाण्याचे नियोजन झाले नव्हते मुख्यमंत्री म्हणून मग मी त्यावेळी बैठक घेऊन मान्यता दिली आणि सीना कोळेगाव मध्ये पाणी आणण्याबाबत काम सुरू झाले. आता ही कामे वेगाने पूर्ण होणार आहेत. दुष्काळी भागातील जनतेच्या शेतकऱ्यांच्या शेतात समृद्धी आणायची आहे. त्यासाठीच आम्ही काम करत आहोत २०१८ मध्ये राज्यात खूप मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता या दुष्काळात आम्ही जलयुक्त शिवार च्या माध्यमातून शिवार समृद्ध करण्याचं काम केलं. समुद्रात वाहून जाणारे पश्चिमी वाहण्याचं पाणी दुष्काळी भागाला मराठवाड्याला देण्याची योजना आम्ही पूर्ण करणार आहोत. त्यातून सुमारे ५३ टीएमसी पाणी मिळणार आहे. गोदावरी उपखोरयाचा एकात्मिक आराखडा आम्ही त्यावेळी तयार केला. समुद्रात वाहून जाणारे पाणी जर गोदावरीच्या उपखोऱ्यात आणून पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू द्यायचा नाही असे सरकारने ठरवले आहे. कारण हे पाणी गोदावरी खोऱ्यात आल्यावर पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्यातील पाणी संघर्ष निश्चित थांबणार आहे.

# जायकोवाडी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे प्रतिवादींना आदेश

**प्रतिनिधी ।** माजलगांव

माजलगाव तालुक्यातील मौजे हारकी निमगाव मधून जायकोवाडी येथे स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यसाठी मा.उच्च न्यायालय खंडपिठ छत्रपती संभाजीनगर यांनी रिट ऑफ मँडेमस जारी केले आहे. मौजे हारकी निमगाव, जायकोवाडी आणि तांडा अशी ग्रुप ग्रामपंचायत असून या गावातील अंतर जास्त असल्याने नागरीकांची गैर सोय होत आहे. म्हणून हारकी निमगाव ग्रामपंचायत येथे सन २०२० साली ग्रामसभा घेवून जायकोवाडी व तांडा मिळून स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यासाठी ग्रामसभेत ठराव पारीत करण्यात आला व संपूर्ण आवश्यक कागदपत्राची पूर्तता करुन रितसर प्रस्ताव मा.गटविकास अधिकारी पं.स.माजलगाव, मा.तहसीलदार माजलगाव, मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.बीड, मा.जिल्हाधिकारी बीड व मा.उपविभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचेकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. सदरील प्रस्तावामध्ये वेळोवेळी त्रुटीची पूर्तता करुन प्रस्ताव ग्रामविकास मंत्रालय मुंबई येथे पाठविण्यात आला होत, असे असतांना ही अद्याप सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात आली नाही. म्हणून श्री.संभाजी जिजाभाऊ येवले (मा.उपसरपंच) व श्री.प्रकाश श्रावण नाडे यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे रिट ऑफ मँडेमस म्हणजेच परमादेश दाखल करुन जायकोवाडी येथे स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यासाठी मा.न्यायालयास विनंती केली होती. जेंव्हा एखादा सरकारी अधिकारी त्याचे कर्तव्य पूर्ण करीत नाही अशा वेळी रिट ऑफ मँडेमस म्हणजेच परमादेश दाखल करुन त्यावर मा.उच्च न्यायालयाकडून तसे कर्तव्य पूर्ण करण्याचा आदेश देण्यात येतो.

म्हणून याचिकाकर्त्यांने मौजे हारकी निमगाव मधून जायकोवाडी व तांडा मिळून स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यासाठी व तसा आदेश प्रतिवादींना देण्यासाठी सदर याचिका दाखल केली आहे. यामध्ये याचिकाकर्त्याचे म्हणणे ऐकून मा.न्यायमूर्ती श्री.मंगेश पाटील साहेब व मा.न्यायमूर्ती श्री.प्रफुल्ल खुबलकर साहेब यांनी दि.३१/०१/२०२५ रोजी सदरील याचिकेत उपरोक्त नमुद प्रतिवादींना उत्तर दाखल करण्याचे आदेशीत केले आहे. सदरील याचिकेत मा.अॅड.सुभाष नाडे यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मा.न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडली यावेळी त्यांना मा.अॅड.मिलींद संदनशिव यांनी सहकार्य केले.



**आज बीडमध्ये रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी आले होते त्यांना बीडच्या रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबाबत सर्व भीमसेनिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले.याप्रसंगी निवेदन अनुरथ वीर(फौजी ) बाळासाहेब मोरे संदीप जाधव राज कांबळे यशपाल अमोल अहिरे अनेक भीमसैनिक उपस्थित होते.**



# अशी आहे आष्टी उपसा सिंचन योजना क्र. 3

**प्रतिनिधी ।** बीड

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथे आज आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक ३ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलाव हे शिंपोरा बोगदा कामाचा शुभारंभ करण्यात आला. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा आष्टी उपसा सिंचन योजना एक महत्त्वाचा भाग आहे.**

जलसंपदा विभागाने जुलै २००९ मध्ये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या सुधारित जल नियोजनास मान्यता प्रदान केली आहे. या योजनेच्या अद्ययावत द्वितीय सुधारित प्रशासकीय प्रकल्प अहवालास ऑक्टोबर २०२२ मध्ये ११ हजार ७२६ कोटी ९ लक्ष किंमतीस मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.या प्रकल्पाच्या उपसा सिंचन योजना क्र. १ मधून १०.४१ अ.घ.फू. व उपसा सिंचन क्र.२ मधून ७.५७ अ.घ. फू. पाणी धाराशिव जिल्हयातील एकूण ८७,१८८ हेक्टर क्षेत्रासाठी आणि आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ द्वारे ५.६८ अ.घ.फू. पाणी बीड जिल्ह्यासाठी २७,५४३ हेक्टर क्षेत्रास देण्याचे प्रस्तावित आहे.

आष्टी साठवण तलाव - उपसा सिंचन योजना क्र.३

योजनेचे स्वरूप - उपसा सिंचन योजना -३ साठी १.६८ अ.घ.फु पाणी उजनी जलाशय ते खुंटेफळ साठवण तलाव येथे ६० दिवसांत उपसा करून आणण्याचे नियोजित आहे. यामध्ये ७२ कि.मी. पाईपलाईनद्वारे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणण्यात येणार आहे. तेथून पुढे ३ उपसा टप्प्यात आष्टी तालुक्यातील ८१४७ हेक्टर क्षेत्रामधील सिंचनास लाभ मिळणार आहे.

योजनेचे फायदेः कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात आष्टी उपसा सिंचन योजना -३ ची कामे पूर्ण झाल्यास आष्टी तालुक्यांत खालील लाभ होतील. ॰ अवर्षण प्रवण व दृष्काळग्रस्त भागातील २६ गावांतील ८१४७ हेक्टर क्षेत्राला सिंचन व पिण्याच्या पाण्याचा लाभ होईल. त्याचा अंदाजे ४१,९७५ इतक्या लोकसंख्येला फायदा होईल.॰ सन २०२३-२४ च्या उन्हाळ्यात प्रशासनाद्वारे आष्टी तालुक्यांत ६२ टँकरद्वारे पिण्यासाठी पाण्याची सोय केली होती. आष्टी उपसा सिंचन योजना-३ पूर्ण झाल्यास पाणी टँकरच्या संख्येत घट होईल.॰ या योजनेद्वारे अंदाजे ३४६४० जनावरांच्या व १२११४८ कुक्कुट पक्षांच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच चारा छावण्यांचा प्रश्न मार्गी लागेल.॰ या योजनेद्वारे लाभक्षेत्रात येणा-या गावातील नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होवून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.खुंटेफळ साठवण तलाव या तलावाची साठवण क्षमता १.६८ अ.घ.फू. / ४७.५७ द.ल.घ.मी. इतकी आहे. सदर धरणाची लांबी २००० मी. व उंची २८.५० मी. इतकी आहे. सद्यस्थितीत एकूण ५८ लक्ष घनमीटर मातीकामापैकी ४०.६० लक्ष घनमीटर (७०%) चे काम पूर्ण झालेले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.टप्पा क्र-१ उजनी जलाशय (मौजे शिंपोरा) ते थेट खुंटेफळ साठवण तलाव- दि. १५ मार्च २०२४ रोजी कामाची निविदा अंतिम करून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.सद्य:स्थितीत पंपगृह व उर्ध्वगामी नलिकांची कामे प्रगतीपथावर आहेत. टप्पा क्रमांक १ उजनी जलाशय ते खुंटेफळ साठवण तलाव संरेखेचे काम ३५% पूर्ण झाले आहे. पुढील टप्पा ३ अ (सिंचन क्षेत्र-५३०२ हेक्टर), टप्पा ३ व (सिंचन क्षेत्र-७४५ हेक्टर), व टप्पा ४ (सिंचन क्षेत्र-२१०० हेक्टर) चे काम झाल्यानंतरच प्रथम टप्पा १.६८ अ.घ.फू. च्या पाणी साठ्याच्या मर्यादेत ८१४७ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मित होणार आहे.

# सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे २५ वा रक्तदान शिबिर आयोजन!

**प्रतिनिधी ।** बीड

रक्तदान हे जीवन वाचविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा सामाजिक कार्याचा घटक आहे विविध कारणाने शस्त्रक्रिया साठी रक्ताची आवश्यकता असते आणि आपण दिलेल्या रक्तांमुळे कोणाचा तरी जीव वाचत असतो या उद्देशाने सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे गेल्यास सोळा-सतरा वर्षापासून २४ वेळा रक्तदान शिबिर आयोजित केली आहे आता २५ व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आला आहे ९ फेब्रुवारी सकाळी दहा वाजल्यापासून रात्री चार वाजेपर्यंत जिल्हा रुग्णालय येथे सोहळा पार पडणार आहे या रक्तदान शिबिरास बीड शहरातील युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे व रक्तदान शिबिरात सहभाग घेऊन आता योगदान द्यावा तुमचं रक्त दिल्यामुळे कोणाचं तरी जीवनाच्या आशेचा किरण उमटू शकतो असे आवाहन सलीम अध्यक्ष युवा मंच संस्थापक शेख सलीम अध्यक्ष यांनी केले आहे ज्यांना कोणाला रक्तदान करायचं आहे त्यांनी या मोबाईल ९८८१७२७२३६ / ९१३०७३०२०७ नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे केले आहे!

बीड शहरातील समाजसेवक सलीम अध्यक्ष गेली १६ १७ वर्षापासून रक्तदान शिबिर आयोजित करत असतात त्यांनी केलेले या कार्यामुळे त्यांची जिल्हाभर ओळख रक्तदात्यांचा आधार म्हणून झाली आहे या हजारो रुग्णांना त्यांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामुळे लाभ भेटला आहे त्यांच्या या कार्याबद्दल समाजात कौतुकाची थाप मिळत आहे



# शासकीय सेवेत असताना आष्टी तालुक्यातील मुख्याध्यापकाच्या चौकशीला अधिकारी मिळेल

**प्रतिनिधी ।** बीड

आष्टी तालुक्यातील तालुक्यातील सावरगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक तसेच श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्टचे कथित अध्यक्ष दादासाहेब नरहरी चितळे यांनी सहायक धर्मादाय आयुक्तांकडे सादर केलेल्या देवस्थानच्या कागदपत्रात शपथपत्रावर व्यवसाय शेती दर्शवून न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणी व खोटी माहिती दिल्यामुळे मुख्याध्यापकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची समिती सदस्य बदलावे लागत आहे. चौकशीसाठी अधिकारी मिळत नसल्याची स्थिती आहे. मागणी आष्टी तालुक्यातील कन्हेवाडी येथील राम खाडे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे केली. परंतु याप्रकरणी चौकशी समिती विविध कारणांमुळे बदलावी लागली आहे.

त्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी उपशिक्षणाधिकारी मैना बोराडे, शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे, शिक्षण विस्तार अधिकारी राठोड यांची चौकशी समितीनेमली होती. परंतु हे प्रकरण सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित आहे. तसेच या प्रकरणाची क्लिष्टता व स्वरुप पाहता चौकशी अधिकारी वर्ग तीन दर्जाचे असल्याने मर्यादा येऊ शकतात, त्यामुळे वरिष्ठ पातळीवरून चौकशी करावी, असे शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना कळविले. तर अगोदरच अनेक प्रकरणे चौकशीसाठी असल्याने इतर अधिकाऱ्यांची चौकशी समिती प्रमुख म्हणून नेमणूक करावी विनंती उपशिक्षणाधिकारी मैना बोराडे यांनी केली.



# भागुजीराव ढेकळे विद्यालयात वार्षिक स्नेहसम्मेलन उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी ।** गेवराई

**तालुक्यातील पाडळसिंगी येथील भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसम्मेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते.पाडळसिंगी येथील एकलिंगेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. राम महाराज वराट यांच्या हस्ते वार्षिक स्नेहसम्मेलनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून पाडळसिंगीचे सरपंच रितेश साबळे, उपसरपंच विकास चौधरी, राम भांडवलकर, बळीराम साबळे, बाबासाहेब दाभाडे, शिवाजी दाभाडे, लक्ष्मण दाभाडे, कामखेडा हायस्कुलचे मुख्याध्यापक राजेंद्र कुर्हे, वडगाव हायस्कुलचे मुख्याध्यापक रावसाहेब भोसले, प्रा.दिपक लाटे आदि उपस्थित होते.**

या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते १० वी व ११ वी १२ वी पर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध कला-गुण दर्शनामध्ये आपला सहभाग नोंदवला. नृत्य, नाटिका, उखाणे, कविता अशा विविध कलांनी मंचावरील कार्यक्रमास रंगत आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख जामकर सी.एस., श्रीमती पुष्पा मस्कर यांनी नियोजन केले व विद्यार्थ्यांच्या नृत्य, अभिनय, रंगभूषा, वेषभूषा या सर्व बाबींना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सर्वश्री सावंत पी.एस., राजेंद्र करवंदे, दिलीप पोकळे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला परिसरातील पालक, ग्रामस्थ, महिला, पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# बारावीचा अभ्यास ,पोलीस भरतीची तयारी आणि फावल्या वेळेत आई बापाला शेतात मदत करणारी कृषीकन्या !

## शाळेला सुट्टी असल्याने लिंबाच्या झाडाखाली पुस्तक आणि दारे धरण्यासाठी हाती खोरं !

**प्रतिनिधी ।** शिरूर कासार

मनाचा निग्रह आणि भविष्यावर लक्ष असले की परिस्थिती वर मात करत साध्यापर्यंत पोहचणे अवघड नसते असाच काहिसा प्रयत्न एक शेतक-याची एकुलती एक कृषीकन्या शाळेला सुट्टी असल्याने पुस्तकाबरोबर उन्हाळी बाजरीला पाणी देण्यासाठी हातात खोरं घेऊन आईबापाला मदतीचा हात देत आहे ,बारावीचे वर्ष म्हणजे एक महत्वपूर्ण शैक्षणीक वळण रस्ता , आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अभ्यास करत पोलीस भरतीचे स्वप्न साकार करण्यासाठी पहाटे चारला किमान चार पांच किलोमिटर धावते.शुक्रवारी शेतात लिंबाच्या झाडाखाली पुस्तकी अभ्यास करत असतांना हाती खोरं सुध्दा घेतल असल्याचे एक चित्र दिसून आले.


तालुक्यातील कान्होबाची वाडी येथील अनुजा शंकर बोरगे ही कालिका देवी मा.व उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीत शिकत आहे ,बारावीचा अभ्यास करत असतांना पोलीस भरतीची तयारी सुध्दा करत आहे ,परिस्थिती जेमतेम असल्याने आपल्या आईवडीलांना मदत म्हणून शाळेला सुट्टी असल्याने पुस्तक आणि दुपारचे जेवन सोबत घेऊन झाडाखाली अभ्यास करता करता उन्हाळी बाजरीला हाती खोरं घेऊन पाणी देते .शनिवारी प्रात्क्टिकल आहे त्याची तयारी करत असतांना शेतात पाणी देणारे हे चित्र निश्चितच प्रेरणादायी म्हणावे लागेल . परिस्थितीलाही शरणागती पत्कारावी लागते त्यासाठी कपाळावर हात लावून नव्हे तर मस्तकात पुस्तक आणि प्रबळ ईच्छाशक्ती असली की भविष्य आपले हात धरून साध्यापर्यंत पोहचवते असा आत्मविश्वास अनुजा बोरगे हीने व्यक्त केला .

# मुंबई कल्याण नगर परळी प्ररामा-१६ रस्त्यावर करोडोंची उधळपट्टी

## मनसेचे कैलास दरेकर यांची चौकशीची मागणी

**प्रतिनिधी ।** बीड

२०२१ ते २०२४ याकाळात वार्षिक देखभाल दुरुस्ती करण्याच्या नावाखाली जवळपास दहा कोटी रूपयांचा खर्च मुंबई-कल्याण -नगर -परळी रस्ता प्ररामा-१६ या रस्त्यावर दि.३१/१२/२०२१ मध्ये १८/७०० ते २२/७००, ४ किमी साठी १० लाख रुपयांची दुरुस्ती, तसेच ४९/०० ते ५१/५००, २.५० किमी साठी ११ लाखांचा खर्च तसेच ५७/०० ते ५९/००, २ किमी साठी १० लाखांचा खर्च ६१/५०० ते ६३/५००, २ किमी साठी १० लाखांचा खर्च तसेच ७३/०० ते ७५/५००, २.५० किमी साठी १० लाखांचा खर्च , तसेच ७९/०० ते ८१/००, २ किमी साठी १० लाखांचा खर्च तसेच ८१/५०० ते ८४/००, २.५० किमी साठी १० लाखांचा खर्च दि.२७/



५/२०२२ या काळात याच रस्त्यावर १८/६७० ते ६३/६७०, ४५ किमी साठी जवळपास ७४ लाखांचा खर्च तसेच ६३/६७० ते १०८/६७०, ९ किमी साठी ३२ लाखांचा खर्च दि.१९/१२/२०२२ मध्ये १०६/०० नळकांडी पुल पुनर्बांधणीसाठी १० लाखांचा खर्च, तसेच १०६/३०० नळकांडी पुलासाठी १० लाखांचा खर्च तसेच १०६/३०० सी.सी ड्रेन साठी १० लाखांचा खर्च, जुलै २०२२ डोंगरकिन्ही पिंपळवंडी अमळनेर ७३ ते ८५ रस्ता सुधारणा नावाखाली ५ कोटी ९६ लाखांचा खर्च या कामाबाबत यापूर्वी तक्रार दाखल केली आहे. दि.९/६/२०२३ या २ किमी साठी १० लाखांचा खर्च तसेच याच काळात देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली १ कोटी २२ लाखांचा काम याच काळात ६३/६७० ते ७३/०० या ९ किमी साठी २५ लाखांचा खर्च एवढा खर्च करून रस्त्याची दुरवस्था झाली आहे या दुरवस्थेची जबाबदारी नेमकी कुणाची का भ्रष्ट अधिकारी जबाबदार का कंत्राटदार याकाळात या रस्त्यावर पाटोदा येथील तत्कालीन उपअभियंता साबळे, शिरूर येथील तत्कालीन उपअभियंता कृष्णा पाण संबळ, तत्कालीन कार्यकारी अभियंता प्रवीण मार्कंडे, तत्कालीन शाखा अभियंता कृष्ण पानसंभळ, नेमकी जबाबदारी कोणाची या भ्रष्टाचाराला संबंधित कंत्राटदाराला कोण पाठीशी घालते यावरून स्पष्ट दिसतं की सदर रस्ता फक्त आणि फक्त भ्रष्टाचाराचं कुरण झालेला आहे याची सखोल चौकशी होऊन भ्रष्टाचाराचा कुरन बनलेल्या रस्त्याला यामधून बाहेर काढणे गरजेचे आहे वरील सर्व कामांची चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मनसेचे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे.

# स्वामी दयानंद सरस्वती यांच्या विचार व कार्यावर दोन दिवशीय राष्ट्रीय परिषद

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

थोर क्रांतिकारी समाज सुधारक महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षानिमित्त भा.शि.प्र. संस्था,संचलित खोलेश्वर महाविद्यालय डॉ.बा.आ. म. विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आय.क्यू.ए.सी. व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी दयानंद सरस्वती यांच्या राष्ट्रवादी विचाराची प्रासंगिकता या विषयावर शुक्रवार शनिवार दि. ०७ व ०८ फेब्रुवारी रोजी दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद होणार आहे.यावेळी भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, डॉ.बा.आ. मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे प्रमुख सहाज्जुदिन शाकीर, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य , मुख्य प्रशासकीय समन्वयक चंद्रकांत मुळे, स्वामीनंद सरस्वती आचार्य, स्वामी विद्यानंद सरस्वती,परिषदेचे बीजभाषक डॉ.नवनाथ आघाव प्राचार्य, आसाराम भांडवलदार, डॉ.दिनकर एस.कळंबे,वीरश्री आर्य डॉ.अजय गव्हाणे, प्रा.रमेश सोनवळकर, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष विजय वालवडकर, कार्यवाह किरण कोदरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या परिषदेसाठी संबधितांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर यांच्यासह इतरांनी केले आहे.



# केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्यावी :- वैभव शिंदे

**प्रतिनिधी ।** नेकनुर

नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी झाल्याशिवाय खरेदी केंद्र बंद करु नये. सोयाबीन खरेदीला मुतदवाढ द्यावी अशी मागणी वैभव शिंदे यांनी केली आहे.सोयाबीन खरेदी केंद्रे सुरु केल्यानंतर सुरुवातीला साठवणुकीचा प्रश्न उभा राहिला, त्यानंतर बारदाणा नसल्याची सबब सांगण्यात आली. एकूण सरकारी खरेदी केंद्रावर सावळा गोंधळच पहायला मिळाला. ६ फेब्रुवारी पर्यंत मुदत वाढवली असली तरी अद्याप लाखो क्विंटल सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरी पडून आहे. आधीच भाव कमी त्यात खरेदी केंद्रे बंद केली तर मिळेत त्या भावाला सोयाबीन विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येईल व यातून त्यांचे मोठे नुकसान होईल. यावर्षी केंद्र सरकारच्या डीओसी व पामतेल आयातीमुळे देशांतर्गत सोयाबीनचे भाव हमीभावापेक्षाही कमी झाले आहेत.ज्यामध्ये शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही भरुन निघत नाही. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. सरकारने सोयाबीनची नाफेडमार्फत हमीभावाने खरेदी केंद्रामार्फत खरेदी चालू केली आहे.त्यासाठी ६ फेब्रुवारी पर्यंत मुदत दिली आहे.परंतू अद्यापही नोंदणी केलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी शिल्लक आहे. अशा परिस्थितीत खरेदी बंद झाली तर शेतकऱ्यांना बाजार समितीतच चालू भावात सोयाबीन विक्री केल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे ८०० रुपये प्रति क्विंटल नुकसान होणार आहे.खुल्या बाजारात व बाजार समितीत सोयाबीनला ३५०० ते ४००० हजार रुपये भाव मिळत आहे. तर हमी भाव ४८५१ रुपये आहे. सोयाबीनसाठी होणारा खर्च



व बाजारातील भाव पाहता शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही, त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही काळजी घेत जोपर्यंत शेतकऱ्यांकडील सर्व सोयाबीनची खरेदी होत नाही तोपर्यंत खरेदी केंद्रे सुरु ठेवावीत अशी मागणी वैभव शिंदे यांनी केली आहे.

# शासनानेच शासनाला फसवले?

## मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला दिलेली १० हेक्टर जागा सापडेना

**प्रतिनिधी ।** बीड

वडवणीत मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला गायरान जमीन शासनानेच शासनाकडे २०२१ मध्ये हस्तांतरीत केली होती मा.जिल्हाधिकारी बीड यांनी जागा दिल्याचा आदेशही काढला त्यानंतर मोजनी झाली व मोजनीचा नकाशा झाला.जागेचे मार्कवूट झाले सातबारा अट अ आणि फेरफार झाले व हे सर्व महावितरणच्या नावे झाले.महाविरण लातुर यांना वडवणी तत्कालीन तलाठी, मंडळ अधिकारी यांनी चलन भरुन ताबा पावती दिली.त्यानंर महावितरण यांनी सर्व विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळवले त्यानंतर टेंडरही झाले व नंतर हस्तांतरीत जागेत काम चालू झाले.त्यानंतर तहसीलदार वडवणी यांनी सौर ऊर्जा प्रकल्पालाकडे वाहन येजा साठी रस्ता दिला.दोन किलोमीटर रस्त्याचे कामही पूर्ण झाले.परंतु या ठिकाणी शासनाची जागा नसल्याचे भुमीअभिलेख कार्यालयाकडून सांगण्यात आले.म्हणून तहसीलदार यांनी काम थांबवले.त्यानंतर सर्व शासकीय व खासगी जागेची नव्याने मोजनी केली.गट नं २५९ खाजगी व गट नं२६० गायरान जमीन मोजनी केली आसता या ठिकानी १११.६८ हेक्टर जागा शासनाची गायब झाल्याचे भुमीअभिलेख यांच्या लक्षात आले.या सर्व प्रकरणाची तपासणी भुमी अभिलेख जिल्हा अधिक्षक कृष्णा शिंदे यांनी केली.परंतु संबंधीत जागेची मागणी केली आसता त्यांनी जागा सापडत नसल्याचे स्व:ताहा पाहणी करुन एमएसीबीच्या लक्षात आनुन दिले व आम्हाला शासकीय गायरान जागा मीळत नसल्याचे महावितरणला सांगीतले.आगोदरच बीड जिल्ह्यामध्ये कायदा सुव्यवस्तेचा प्रश्न गंभीर आसतांनाच पुन्हा प्रशासनामध्येच घोटाळा झाल्याचे दिसुन येत आहे.यामुळे शासकीय जागा चोरीला गेलेल्या जागेचा शोध महसुल विभाग किंवा भुमी अभिलेख करेल का?अशी जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे.यावरुन बीड जिल्हा प्रशासनात किती तत्परता आहे हे दिसुन येते.या प्रकरणावरुन वडवणी सह बीड जिल्ह्यात चर्चेला ऊदान आले आहे.

# धनादेश अनादर प्रकरणी आरोपीस एक महिन्याचा कारावास तर १ लाख रु. दंडाची शिक्षा

**प्रतिनिधी ।** बीड

(दि.२९-०१-२०२५) बीड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्री. जोशी साहेब यांनी धनादेश अनादरीत प्रकरणात आरोपी जगदीश दत्तात्रय भोकरे, रा.एम.आय.डी.सी., वाळूज, औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) यांना रु. १ लाख दंड व एक महिना कारावास भोगण्याचे आदेश केलेले आहेत.

बीड येथील डॉ. शिवप्रसाद चरखा यांनी औरंगाबाद येथील आरोपी जगदीश दत्तात्रय भाकरे या व्यक्तीस औषधी बनवण्याच्या कारखान्याचे बांधकामासाठी अग्रीम राशी म्हणून रु.५०,०००/- दिले होते. सदरचे बांधकाम न केल्यामुळे आरोपी जगदीश दत्तात्रय भोकरे यांनी रकमेच्या परतफेडी पोटी रु.५०,०००/- चा धनादेश फिर्यादीस दिला होता; परंतु आरोपीने दिलेला धनादेश अनादरीत झाला, त्यामुळे आरोपीचे विरुध्द फिर्यादी डॉ.



चरखा यांनी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड येथे धनादेश अनादरीत झाल्यामुळे फौजदारी फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकरणात साक्षी पुराव्या अंती व फिर्यादी तर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यानिशी आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द झाला असल्याने आरोपीस १ लाख रूपये दंड व एक महिना कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. सदर प्रकरणी फिर्यादी तर्फे ॲड. शिवाजी साळवे यांनी कामकाज पाहिले, त्यांना ॲड. एस. बी. राख, ॲड.पी.ए. जावळे, ॲड. मिलींद वाघमारे यांनी सहकार्य केले.

# नागरीकांच्या सुविधेसाठी प्रोजेक्ट संवाद पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी ।** बीड

बीड जिल्ह्यात नागरीक हे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे बहुतांश वेळा त्यांना पोलीस स्टेशनशी संबंधीत काम असेल तर त्यांना पोलीस स्टेशनला पोहचायला बराच वेळ लागतो, त्याच बरोबर पोलीस स्टेशनला पोहचण्यासाठी बस भाडे/स्वतःचे वाहन असल्यास इंधन खर्च या स्वरुपात पैसाही खर्च होतो. पोलीस स्टेशनला गेल्यानंतर बऱ्याच वेळा काम होत नाही. किंवा नागरीकांचे समाधान होत नाही. त्यामुळे नागरीकांना वरीष्ठांकडे दाद मागण्यासाठी दुरचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे नागरीकांचे आर्थीक नुकसान तर होतेच परंतु त्याच बरोबर त्यांना शारिरीक व मानसीक हालही होतात.

याच बाबींचा विचार करुन व नागरीकांना चांगली सेवा देण्याच्या भावनेतुन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांचे संकल्पनेतुन संवाद प्रकल्प हा उपक्रम बीड जिल्हा पोलीस दलात राबवला जात आहे. यासाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी ठठ उेवश तयार केला आहे. सदरचा ठठ उेवश हा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांचे कक्षात व पोलीस ठाणे अंमलदार यांचे कक्षात लावण्यात आला आहे. नागरीकांनी आपल्याकडे असलेल्या मोबाईलद्वारे सदरचा ठठ उेवश स्कॅन केल्यानंतर त्यांच्या मोबाईलचे स्क्रिनवर एक लिंक येईल. ती लिंक उघडल्यानंतर एक माहीतीचा फॉर्म येईल. त्यामध्ये नागरीकांना



१) स्वतःचे नाव, २) मोबाईल क्रमांक, ३) ज्या पोलीस ठाण्याच्या संबंधी काम आहे त्या पोलीस ठाण्याचे नाव निवडणे, ४) पोलीस ठाणे येथे भेट देण्याचे कारण किंवा माहीती,५) पोलीस ठाणे येथे भेट दिल्यानंतर किंवा पोलीस ठाण्याच्या कामकाजावर आपण समाधानी आहात काय? ६) समाधानी/असमाधानी असल्यचे कारण,७) तुम्ही दिलेली भेट यावरुन पोलीस ठाणेस किती गुण द्याय? (गुण १-५), ८) सुधारणेसाठी सुचना. सदरची माहीती भरुन ती सबमीट करणे आवश्यक राहील. एखादी व्यक्ती पोलीस स्टेशनच्या कामकाजाबाबत असमाधानी असल्यास त्यांची पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन २४ तासांच्या आत समस्या जाणून घेवुन समाधान करण्याचा प्रयत्न केला जाईल. सदरचा ठठ उेवश हा सोशल मिडीयाच्या माध्यमातुन सुद्धा नागरीकांपर्यंत पोहचवला जाणार आहे. त्यामुळे एखाद्या नागरीकास अवैध धंदे किंवा इतर महत्वाची गोपनीय माहीती द्यायची असेल तर ते सदरचा ठठ उेवश स्कॅन करुन माहीती देवु शकतात. अशा व्यक्तींचे नांव व मोबाईल क्रमांक गोपनीय ठेवले जाईल. तसेच याद्वारे नागरीकांना त्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या ठठ उेवश द्वारे देवु शकतात. नागरीकांनी केलेल्या तक्रारी, दिलेल्या प्रतिक्रीया, सुचना ह्या पोलीस अधीक्षक हे स्वतः पाहु शकणार आहेत. तसेच नागरीकांनी केलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल पोलीसांकडुन घेतली जाणार आहे.

या उपक्रमाद्वरे पोलीस आणि नागरीक यांच्यात समन्वय साधाला जाणार आहे. यापुढे नागरीकांना विनाकारण पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालयात चकरा मारण्याची आवश्यकता नाही. यामुळे नागरीकांचा वेळ व पैशांचा होणारा अपव्यय टाळता येणार आहे. सदरचा उपक्रम हा नागरीकांच्या सेवेसाठी राबवीण्यात येत आहे.संवाद प्रकल्प हा उपक्रम आज दिनांक ०६/०२/२०२५ रोजी पासुन बीड जिल्ह्यात राबवीला जात आहे. सदर उपक्रमाचा नागरीकांनी योग्य उपयोग करुन पोलीस व नागरीकांमध्ये निर्माण झालेली दरी दुर करावी. तसेच नागरीकांनी सुचवीलेल्या सुधारणांचे स्वागत केले जाईल असे मत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी व्यक्त केले आहे.

# दिल्लीत अबकी बार भाजप सरकार?


## पोल डायरी आणि पीपल्स इनसाइट्सनुसार कोणाला मिळणार बहुमत?

**प्रतिनिधी ।** बीड

भारताची राजधानी असणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी ५ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडलं. सर्व ७० जागांसाठी झालेल्या या मतदानात विविध पक्षांच्या उमेदवाराचं भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. आता ही मतपेटी ८ फेब्रुवारी रोजी उघडण्यात येणार असून यातून दिल्लीच्या जनतेनं कोणाला मत रुपी आशीर्वाद दिलाय हे स्पष्ट होईल. मात्र आता मतदान झाल्यावर अनेक एक्झिट पोल समोर येत असून यामाध्यमातून दिल्लीत नेमकी कोणाची सत्ता येणार? याचा अंदाज लावला जात आहे. पोल डायरी आणि पीपल्स इनसाइट्स या लोकप्रिय एक्झिट पोलचे दिल्ली विधानसभा निवडणुकीविषयीचे आकडे समोर आले आहेत.

पोल डायरी एक्झिट पोलमध्ये काय?

दिल्ली विधानसभा निवडणुकीत समोर येत असलेल्या एक्झिट पोलमधून आम आदमी पक्ष आणि भारतीय जनता पार्टी यांच्यात मोठी स्पर्धा असल्याचे दिसून येतंय. दिल्ली विधानसभा निवडणूक एकूण ७० जागांसाठी लढवली जात असून यातील बहुमताचा आकडा हा ३६ आहे. पोल डायरी एक्झिट पोलनुसार भाजपला ४० ते ४५ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. तर आम आदमी पक्षाला १८ ते २५ जागा मिळताना दिसत आहेत. तर कधीकाळी दिल्लीची



गादी सांभाळलेल्या काँग्रेसच्या ०-२ जागा येण्याची शक्यता आहे.

पोल डायरी एक्झिट पोल :
आप - १८-२५
भाजप - ४२-४५
काँग्रेस - ००-०२

पीपल्स इनसाइट्स एक्झिट पोलमध्ये काय?

पीपल्स इनसाइट्स एक्झिट पोलमधून समोर येणाऱ्या अंदाजानुसार दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपच मुसंडी मारणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पीपल्स इनसाइट्सनुसार दिल्लीत आम आदमी पक्षाच्या २५ ते २९ जागा येतील. तर बहुमताचा आकडा गाठणार असल्याचं दिसतंय. भाजपला दिल्ली विधानसभा निवडणुकीत ४० ते ४४ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर काँग्रेसच्या ०-१ जागा येऊ शकतील.

पीपल्स इनसाइट्स एक्झिट पोल :
आप - २५ -२९
भाजप - ४० -४४
काँग्रेस - ०-१

जर मागील तीन विधानसभा निवडणुकांवर नजर टाकली तर यामध्ये आम आदमी पक्षाची म्हणजेच 'आप' पक्षाची खरी ताकद अचूकपणे मोजण्यात एक्झिट पोल अपयशी ठरले आहेत. २०१३ च्या निवडणुकीत त्रिशंकू विधानसभा येण्याचा अंदाज एक्झिट पोलने अचूकपणे वर्तवला होता, परंतु २०१५ आणि २०२० च्या निवडणुकीत 'आप'च्या मोठ्या विजयाचा अंदाज ते अचूकपणे वर्तवू शकले नाहीत.

# ताशी १४० प्रति कि मी ने झाली हायस्पीड रेल्वे चाचणी

## बीडमध्ये रेल्वे कृती समितीने केले रेल्वे इंजिनचे पूजन

**प्रतिनिधी ।** बीड

अहमदनगर बीड परळी या रेल्वेमार्गाला आता चांगलीच गती मिळाली असून आज अहमदनगर ते बीड हायस्पीड रेल्वे चाचणी घेण्यात आली प्रति तास १४० किमी ने हि चाचणी यशस्वी झाली आणि बीडकरांनी आनंदोत्सव साजरा केला बीड रेल्वेस्थानकावर स्वतंत्र सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या वतीने रेल्वे इंजिनचे पूजन करण्यात आले त्यानंतर रेल्वे अधिकार्याचा सत्कार देखील करण्यात आला.

जिल्हावासियांच्या दृष्टीने आजचा दिवस सोनेरी पहाट घेवून उगवला. गेल्या अनेक दशकांपासूनचे स्वप्न आज रेल्वे पाहिल्यानंतर पुर्णत्वास जात असल्याचे चित्र बीडच्या रेल्वे स्टेशनवर पहायला मिळाले. विघनवाडी येथील रेल्वे स्टेशनवरून निघालेली रेल्वे १४० च्या स्पीडनेआज दुपारी १.४५ वाजता बीडच्या रेल्वे स्टेशनवर येवून थांबली.




उपस्थित बीडकरांनी रेल्वेचे उत्स्फुर्तपणे स्वागत केले. बीडच्या स्टेशनवर येताच सीआरएस टीममधील रेल्वेच्या वरिष्ठ अधिकार्यांनी प्लॉट फॉम क्रमांक १ च्या बाजुला वृक्षारोपन केले. दरम्यान बीडकरांच्या स्वप्नपुर्तीचा आनंद गंगनात मावेनासा झाला असून खा.बजरंग सोनवणे, आ.संदीप क्षीरसागर यांनीही नवगणराजुरी येथील रेल्वे स्थानकाला भेट देवून रेल्वे अधिकार्यांशी चर्चा केली. त्यानंतर हि रेल्वे बीडच्या स्थानकावर आली बीड शहरातील पालवण रोडवरील रेल्वे स्टेशनवर आलेली रेल्वे पहाण्यासाठी बीडकरांनी मोठी गर्दी केली होती. गेल्या अनेक वर्षांपासूनचे स्वप्न पुर्ण होत असल्याने बीड शहराती रेल्वे संघर्ष समितीचे पदाधिकारी, जेष्ठ नागरिकांनी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभे राहून रेल्वेचे स्वागत केले.यावेळी रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या वतीने रेल्वे इंजिनचे पूजन केले त्यानंतर समितीच्या वतीने रेल्वे अधिकार्याचा सत्कार केला त्यात रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांचे स्वागत समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा अशोक शेटे यांनी सोइओ अविनाश पांडे यांचा सत्कार जेष्ठ सदस्य सत्यनारायण लाहोटी आणि चंपावतीपत्र चे संपादक सुनील क्षीरसागर यांनी,सीई यादव यांचा सत्कार सुरेश मेखे व लाईक अहमद यांनी ,अभियंता लोळगे यांचा सत्कार शांतीलाल पटेल मंगेश लोळगे आणि डॉ अरुण भश्मे यांनी ,तर राजीवजी वर्मा यांचा सत्कार संपादक रामचंद्र जोशी सुरेश बुद्धदेव आणि आपासाहेब शिंदे यांनी केला



# 'इराणने जर माझी हत्या केली तर त्याला बरबाद केले जाईल', डोनाल्ड ट्रम्प यांची उघड धमकी

**प्रतिनिधी ।** न्युयॉर्क

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबद्दल मोठी भविष्यवाणी केली आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या सल्लागारांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की जर इराणने त्यांची हत्या तर इराणला संपूर्णपणे नष्ट करावे. इराणकडून यावर अद्याप कोणतीही प्रतिक्रीया आलेली नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला उघड धमकी दिल्याने खळबळ उडाली आहे. ट्रम्प यांनी सांगितले की मी माझ्या सहकाऱ्यांना निर्देश दिलेले आहे जर इराणने माझी हत्या केली तर त्याला ( इराण ) बर्बाद केले जाईल. इराणवर अधिकाधिक निर्बंध लादण्याच्या कागदपत्रांवर सह्या करण्याच्या दरम्यान ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की,' जर त्याने ( इराण ) असे केले ( माझी हत्या ) तर त्याला तबाह केले जाईल.' ते म्हणाले की मी निर्देश दिले आहेत की जर ते असे करतील तर त्यांना नष्ट केले जाईल,त्यानंतर काहीच शिल्लक राहणार नाही.'

इराणने रचला होता कट

अमेरिकेच्या न्याय विभागाने नोव्हेंबरमध्ये आरोप केले होते की राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणूकीपूर्वी इराणने डोनाल्ड ट्रम्प यांना मारण्याचा कट रचला होता, ज्यास नाकाम केले होते. इराणी अधिकाऱ्यांनी सप्टेंबरमध्ये फरहाद शकेरी ( ५१) नावाच्या व्यक्तीला ट्रम्प यांच्यावर नजर ठेवणे आणि त्यांची हत्या करण्याचे आदेश दिले होते असे अमेरिकन न्याय विभागाने म्हटले होते. शकेरी आता देखील इराणमध्ये आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT